# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई -विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ठाणे ता.जि.ठाणे

फोन नं.०२२-२९४५१००१

Email ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्र.३२८ दिनांक :- २१/११/२०२१

**खुन करून फरार झालेल्या आरोपीला मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेकडुन जेरबंद**

-----ooo----

दिनांक ०८.१०.२०२१ रोजी पासुन ते दिनांक २०.१०.२०२१ रोजी पावेतो (नक्की तारीख वेळ माहीती नाही) जीवन नगर,अदानी अपार्टमेंट,४ था मजला,रुम नं.४०८,गवराईपाडा नाका,संतलिला हायस्कुल जवळ या ठिकाणी आरोपी नामे विशाल ठाकुर याने त्याचे सोबत राहत असलेली मयत महिला वर्षा मोहन गोयल हिस कोणत्यातरी कारणावरुन कशाने तरी जिवे ठार मारुन पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने तिचा मृतदेह चादरीमध्ये गुंडाळुन,तो बाथरुम मध्येठेवुन बाहेरुन कुलुप लावुन बंद करुन पळुन गेला म्हणुन अशोक निंबा पाटील ,पोलीस शिपाई ,ब.नं. २५५८.नेमणुक-पोलीस मुख्यालय ,मि. भा .व. वि. पोलीस आयुक्त पोलीस आयुक्तालय,संलग्न वालीव पोलीस यांनी फिर्याद दिले वरुन दिनांक २०.१०.२०२१ रोजी वालीव पोलीस ठाणे गु. रजि. नं. ११९४/२०२१ भा. द. वि. सं. कलम ३०२, २०१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर संवेदनशील गुन्हयाचा मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेकडुन समांतर तपास करण्याबाबत वरिष्ठांनी आदेश दिले होते.त्याप्रमाणे सदर आरोपीची गोपनीय व तांत्रिक माहिती काढुन तो उत्तरप्रदेश येथे त्यांचे मुळगावचे परीसरात असल्याच्या माहितीवरुन मध्यवर्ती युनिटचे सपोनिरी/ दत्तात्रय सरक, पोहवा/ मत्ते, पोना/ शिवाजी पाटील अशा पथकास वरिष्ठांनी योग्य त्या सुचना देवुन रवाना केले.त्याप्रमाणे सदरचे पथक हे उत्तरप्रदेश येथिल जिल्हा-बस्ती येथे जावुन आरोपीताचा त्यांच्याकडे कोणताही धागादोरा नसतांना ,सतत दहा दिवस आहोरात्र मेहनत घेवुन ,आरोपीताचा तपास करुन उत्तरप्रदेश येथिल स्पेशल टास्क फोर्सचे पोलीस निरीक्षक सत्यप्रकाश सिंह पोलीस उपनिरी अलोककुमार राय व पोलीस स्टाफ यांचे मदतीने राजकुंवर रामनरेश सिंह उर्फ विशाल ठाकुर ,राठी,परसोईया,पोस्ट सागर ठाणा ,सोनहा जनपथ बस्ती ,उत्तरप्रदेश यास ताब्यात घेतले.त्याचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने विचारपुस करता,त्याचा गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास पुढील कार्यवाही करीता वालीव पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले.गुन्हयाचा पुढील तपास वालीव पोलीस ठाणे करीत आहे.

सदर कार्यवाही पोलीस उप आयुक्त , डॉ. महेश पाटील ,यांचे मार्गदर्शनाखाली मध्यावर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो.नि.धनाजी क्षीरसागर,सपोनि/ दत्तात्रय सरक, सपोनि/ आंबवणे,सपोनि/बेंन्द्रे, पो.हवा. जनार्दन मते.पो.ना. शिवाजी पाटील,पोना/काळे यांनी केलेली आहे.